नवराष्ट्र

# दुर्गम भागात स्वच्छतागृह उभारण्याचे कार्य कौतुकास्पद

**पुणे** : महाबळेश्वरसारखे गाव स्वच्छतेमध्ये पहिल्या क्रमांकावर येते आणि राज्यातील इतर काही गावात स्वच्छतागृहच नाहीत, हा मोठा विरोधाभास आहे. सरकारच्या अनेक योजना आहेत, परंतु त्या तळागातील नागरिकांपर्यंत पोहचत नाहीत. त्यामुळे अशी गावे या योजनांपासून वंचित राहतात. गावात स्वच्छतागृह नसल्यामुळे महिला समस्याना तोंड द्यावे लागते. अशावेळी फिनोलेक्स इंडस्ट्रीज व मुकुल माधव फाउंडेशन यांच्या प्रयत्नातून ३३२ शौचालये उभारली गेली आहेत. या दुर्गम भागात त्यांनी केलेले कार्य कौतुकास्पद आहे, अशा शब्दात पालघरचे जिल्हाधिकारी डॉ. कैलास शिंदे यांनी मुकुल माधव फाउंडेशनच्या कार्याचा गौरव केला. फिनोलेक्स मुकुल माधव फाउंडेशनकडून पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागात शौचालयांची उभारणी करण्यात आली आहे.



## शौचालय, सौरदिव्यांचे उद्घाटन

आदिवासी बांधवांमध्ये स्वच्छतेविषयी जागृती आणि शौचालयांची सुविधा उपलब्ध करून देण्यात फाउंडेशनने घेतलेला पुढाकार महत्वाचा आहे. गावातील शौचालयांची देखभाल आणि त्याचा होत असलेला वापर समाधानकारक आहे,असे मत डॉ. कैलास शिंदे यांनी केले.

## अस्वच्छेतेमुळे अनेक आजार उद्भवतात

मेहता म्हणाले, अस्वच्छेतेमुळे अनेक आजार उद्भवतात. परिणामी, ग्रामीण भागात राहणाऱ्या नागरिकांना आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागतो. ही बाब लक्षात घेऊन फिनोलेक्स व मुकुल माधव फाउंडेशनने ग्रामीण भागात शौचालय उभारून स्वच्छतेबाबत जागृती सुरु केली आहे.पुढील सहाव्या टप्प्यात आणखी १२७ शौचालये उभारली जाणार आलेत.

Pune Plus Edition
Jan 28, 2020 Page No. 4